| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | **उपअधीक्षक, भूमि अभिलेख , गट-ब (एकूण १४ पदे)** | १० | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | १* |
| | महिला - | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | विकलांग व्यक्ति - | -- | | | | | | | | |
| ९ | **उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट ब (एकूण १ पद)** | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | महिला - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | विकलांग व्यक्ति - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १० | **सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट ब (एकूण २ पद)** | -- | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | महिला - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | विकलांग व्यक्ति - | -- | | | | | | | | |
| ११ | **सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट ब (एकूण ४ पदे)** | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | ३ |
| | महिला - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | विकलांग व्यक्ति - | -- | | | | | | | | |
| १२ | **नायब तहसिलदार गट-ब (एकूण ५२ पद)** | १७ | ८ | ४ | ५ | ४ | १ | -- | २ | ११ |
| | महिला - | ५ | ३ | १ | २ | १ | -- | -- | -- | ३ |
| | खेळाडू - | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | विकलांग व्यक्ति - | -- | | | | | | | | |
| १३ | **मुख्याधिकारी गट-ब (एकूण २८ पद)** | १४ | ५ | १ | १ | २ | -- | २ | १ | २ |
| | महिला - | ४ | २ | -- | -- | १ | -- | १ | -- | १ |
| | खेळाडू - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | विकलांग व्यक्ति - | -- | | | | | | | | |

**टीप :-**

**१.१** * अशी खुण केलेली पदे अनुशेषाची आहेत.

**१.२** महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या संवर्गाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

**१.३** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**१.४** उपरोक्त पदांपैकी कक्ष अधिकारी, गट ब वगळता अन्य सर्व पदांना विभागीय संवर्ग, संरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली २०१० लागू आहे.

**२.** सदर परीक्षा खालील दोन टप्प्यांत घेण्यात येईल

(१) लेखी परीक्षा :- एकूण ८०० गुण. (२) मुलाखत :- १०० गुण.

**३. वयोमर्यादा :-**

**३.१** उपरोक्त पदाकरिता दिनांक १ मे, २०१३ रोजी वय किमान १९ वर्षे असावे व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**३.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(२) अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

(३) पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(४) माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

(५) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४. शैक्षणिक अर्हता :-**

**४.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

**४.२** राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१३ ची माहिती अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक २७ सप्टेंबर, २०१३ पर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच ज्या पदवीसाठी अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल त्या पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक २७ सप्टेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण केली असली पाहिजे.

**५. शुल्क : ५.१ :-** अमागास - रु. ४१०/- **५.२ :-** मागासवर्गीय - रु. २१०/-

**६. अर्ज करण्याची पद्धत :-**

**६.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**६.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ७ सप्टेंबर, २०१३ ते दि. २७ सप्टेंबर, २०१३** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहिल.

**६.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

